# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
# Date: 08 October 2023
# Time: 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
## आकाशवाणी औरंगाबाद
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक : ०८ ऑक्टोबर २०२३ दुपारी १.०० वा.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था- इस्रोनं गगनयानच्या चाचणीची तयारी सुरू केली आहे. २०२४ मध्ये अंतराळात मानवरहित यान तसंच मानवांना अंतराळात पाठवण्याच्या उद्देशानं यानातील व्यवस्थेची कार्यक्षमता तपासणं, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. चाचणीत बाह्य अवकाश कक्षेत यानाला वायुमंडलातून पुन्हा पृथ्वीवर परत आणून बंगालच्या उपसागरात उतरवलं जाणार आहे. भारतीय नौदलाच्या कर्मचाऱ्यांनी यासाठी सराव सुरू केला असून या चाचणीच्या यशामुळं पहिल्या मानवरहित गगनयान मोहिमेचा टप्पा निश्चित होईल आणि शेवटी पृथ्वीच्या कमी कक्षेत बाह्य अवकाशात मानवयुक्त मोहिमेचा मार्ग निश्चित होण्यास मदत होणार आहे. यासाठी निवडलेले चार अंतराळवीर बंगळुरुच्या अंतराळ प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत आहेत.

****

सिक्कीममध्ये चार ऑक्टोबरला आलेल्या पुरातील मृतांचा आकडा ३२ वर पोहचला आहे. त्यात नऊ लष्करी जवानांचा समावेश असून २२१ जण अद्याप बेपत्ता आहेत. पुराच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय कुमार मिश्रा यांनी आज सकाळी गंगटोक इथं मुख्यमंत्री प्रेम सिंग तमंग यांची भेट घेवून एकंदर पूर परिस्थितीचा आढावा घेतला. केंद्र सरकारनं या भागातील नुकसानीचा अंदाज घेऊन आवश्यक मदत पोहोचवण्यासाठी एका आंतर मंत्रालयीन केंद्रीय पथकाची स्थापना केली आहे, असं मिश्रा यांनी सांगितलं.

****

कर्नाटकातील अत्तीबेले इथं काल सायंकाळी फटाक्यांच्या दुकानाला लागलेल्या भीषण आगीत १४ जणांचा होरपळून मृत्यू झाला. हे ठिकाण तामिळनाडूमधल्या होसूरपासून दहा किलोमीटर अंतरावर आहे. मृत सर्व तामिळनाडू इथले आहेत. अपघातावेळी फटाक्यांच्या गोदामात सुमारे वीस लोक काम करत होते. या आगीत दुकान मालकासह अन्य चार जण होरपळले. त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे असून आग आटोक्यात आणण्यात आली आहे. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले असून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

****

भारतीय वायू दलाचा एक्यान्नवावा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. या दिनानिमित्त उत्तर प्रदेशच्या प्रयागराज इथं बामरौली वायू दल तळावर विशेष संचलन पार पडलं. वायू दल प्रमुख एअर चीफ मार्शल विवेक राम चौधरी यांच्या उपस्थितीत वायुसेनेच्या नव्या ध्वजाचं अनावरणही करण्यात आलं. भारतीय वायुसेना–वैश्विक हवाईशक्ती या अनुषंगानं हा दिवस साजरा होत असल्याचं चौधरी यांनी नमूद केलं.

यंदा पहिल्यांदाच या संचलनाचं नेतृत्व महिला अधिकारी – ग्रुप कॅप्टन शालिजा धामी यांनी केलं. महिला वायु सैनिकांच्या तुकडीनही संचलनात सहभाग घेतला, यामध्ये महिला अग्निवीरांचाही समावेश होता. याप्रसंगी स्काय पॅरा जंपरच्या माध्यमातून हवाई प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. दरम्यान, प्रयागराजच्या संगम परिसरात दुपारी विमानांचं प्रात्यक्षिकं सादर होणार आहे.

या दिनानिमित्त वायू दल प्रमुख एअर चीफ मार्शल विवेक राम चौधरी यांचा विशेष संदेश आज सकाळी आकाशवाणीवरुन प्रसारीत झाला.

****

दहशतवादाचं समूळ उच्चाटन करण्याची वेळ आली असून याबाबत शून्य सहिष्णुता धोरणावर काम करण्याची गरज आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल देहरादून इथं अखिल भारतीय पोलिस विज्ञान काँग्रेसला संबोधित करताना नमूद केलं. भारताच्या प्रगतीसाठी कायदा आणि सुव्यवस्था, अंतर्गत आणि सीमेवरील सुरक्षेच्या बळकटीची गरज त्यांनी व्यक्त केली. केंद्र सरकारनं गेल्या नऊ वर्षात

जम्मू –काश्मीर, नक्षलग्रस्त भाग तसंच ईशान्येकडील राज्यातील कायदा–सुव्यवस्था सुधारण्यात लक्षणीय यश मिळवल्याचं शहा यांनी म्हटलं आहे.

****

पुणे इथून नांदेडकडं निघालेल्या एसटी बसचा बीड जिल्ह्यातल्या लिंबा गणेश इथं आज सकाळी अपघात झाला. अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ बसच्या दिशेने धाव घेत प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढलं. या अपघातात पाच प्रवासी जखमी झाले आहेत. चालकाचा ताबा सुटल्यानं बस महामार्गालगत असलेल्या शेतात घुसल्यानंतर हा अपघात घडला.

****

नाशिक जिल्ह्याच्या वणी इथल्या श्री सप्तशृंगी गडाच्या विकासासाठी तयार केलेल्या पर्यटन आराखड्यास लवकरच मान्यता देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे .काल जिल्ह्यातील कळवण आणि सुरगाणा इथल्या विकास कामांचं भूमिपूजन तसंच शेतकरी कृतज्ञता मेळावा त्यांच्या उपस्थितीत झाला त्यावेळी ते बोलत होते.

****

कोल्हापुरचा शाही दसरा उत्सव राज्य शासनानं ‘राज्य महोत्सव’ म्हणून घोषित केला आहे .१५ ते २४ ऑक्टोबर दरम्यान असलेल्या या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

****

अकरा लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलेल्या जहाल महिला नक्षलवादी रजनी उर्फ कलावती समय्या वेलादी हिनं गडचिरोली इथं काल आत्मसमर्पण केलं. आत्मसमर्पण योजनेंतर्गत तिला साडेचार लाख रुपयांची मदत मिळणार आहे.

****

उच्च तंत्रज्ञानावर आधारित वैद्यकीय उपकरणांच्या जागतिक स्पर्धेत भारताचा जगातील पहिल्या पाच आरोग्यसेवा उत्पादकांमध्ये समावेश आहे, असं केंद्रीय मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आंतरराष्ट्रीय आरोग्य सेवा तंत्रज्ञान परिषदेत उद्घाटनपर भाषणात आज ते बोलत होते.

****